माहितीचा अधिकार

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ /३६४४+३६४५/२०२५/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

अपिलार्थी	उत्तरवादी	
	जन माहिती अधिकारी तथा	प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जयकर दिनकर जाधव	कार्यालय अधीक्षक (रवका) दिव्यांग सक्षमीकरण आयुक्तालय, पुणे	उप आयुक्त दिव्यांग कल्याण आयुक्तालय, पुणे

(सुनावणी दिनांक- १४.०७. २०२६)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचे कडे दि. २९.०८.२०२५ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेली आहेत. द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये माहिती देण्यास टाळाटाळ असे नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. आज रोजी सुनावणीसाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी हजर आहेत. अपिलार्थी गैरहजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात अपीलार्थी यांनी माहिती अर्जानूसार खालील प्रमाणे माहिती मागीतलेली आहे.

द्वितीय अपिल क्र.	माहिती अर्ज दिनांक	माहितीचा तपशील
३६४४/२०२५	०५.०२.२०२५	१) दिव्यांग प्रवर्गातून नोकरी मिळविलेले ३५९ जणांची यादी २) दिव्यांगांची यादी ३५९ पैकी दिनांक २४.०९.२०२४ रोजीच्या पत्रानुसार आपणाकडून खऱ्या दिव्यांगांची नावे कमी करण्यात आलेल्या उमेदवाराची यादी ३) आपले दिव्यांग आयुक्त कार्यालयाने २४.०९.२०२४ रोजीच्या पत्रानुसार दिव्यांग यादीतून कमी करण्यात (खऱ्या दिव्यांग) उमेदवार यांच्या फेरतपासणी अहवाल (कारवाई) इ. माहिती मिळणेबाबत.
३६४५/२०२५	०५.०२.२०२५	१) दिव्यांग प्रवर्गातून नोकरी मिळविलेले ३५९ जणांची यादी २) दिव्यांगांची यादी ३५९ पैकी दिनांक २४.०९.२०२४ रोजीच्या पत्रानुसार आपणाकडून खऱ्या दिव्यांगांची नावे कमी करण्यात आलेल्या उमेदवाराची यादी ३) आपले दिव्यांग आयुक्त कार्यालयाने २४.०९.२०२४ रोजीच्या पत्रानुसार दिव्यांग यादीतून कमी करण्यात (खऱ्या दिव्यांग) उमेदवार यांच्या फेरतपासणी अहवाल (कारवाई) इ. माहिती मिळणेबाबत.

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, " दि. १३.०३.२०२५ च्या पत्रान्वये दोनही प्रकरणात अपिलार्थी यांना उत्तर दिले आहे. "

उपलब्ध अभिलेखांच्या पाहणीतून, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उत्तर दिल्याचे दिसून येते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ०६.०६.२०२५ च्या प्रथम अपिलाच्या निकालपत्रामध्ये अपिलार्थी यांचे अपिल निकाली काढल्याचे दिसून येते. सुनावणीकामी अपिलार्थी गैरहजर असल्यामुळे त्यांचे म्हणणे समजू शकले नाही. प्रकरणी नियमाप्रमाणे कार्यवाही झाली आहे.

सबब आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

प्रस्तुत दोन द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे

जावक क्र.रामाआ / ३६४४+३६४५/२०२५/पुणे 4855 दिनांक 31/10/25

रामाआ-पुणे/२०२५/NSB